भाग ९

।। चिंतनक्षण ।।

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

।। चिंतनक्षण ।।

भाग : १

डॉ. सुहास पेठे
एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

*** चिंतनक्षण : भाग-९ ***

पुस्तकरूपाने प्रकाशित सातवी आवृत्ती : सप्टेंबर २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

प्रार्थना व शरणागती म्हणजे दुबळेपणा वा प्रयत्न टाळण्याचा मार्ग नसून, कसून केलेल्या अनेक प्रयत्नांतला शेवटचा प्रयत्न आहे.[२४१]

जन्ममृत्यूने अस्तित्व सिद्ध होत नाही, ते आकार घेऊ शकते हे सिद्ध होते.२४२

वाट्याला आलेल्या दुःखाबद्दल तक्रार करणे म्हणजे माझ्या पेपरचे गुण मलाच का दिले गेले असे म्हणण्यासारखे आहे.[२४३]

अहंकार म्हणजे सर्वांत
मोठी बेसावधता आहे.[२४४]

आधी घेण्याची वेळ आल्यास
घेतलेल्यापेक्षा पुढे जास्त द्यावे
आणि आधी द्यायची वेळ आल्यास
दिलेल्यापेक्षा पुढे कमी घ्यावे.२४५

आईवडिलांकडून मिळालेली
देहाची शिदोरी निसर्गक्रमाने
संपेल, पण जिवाने आणलेले
संचिताचे ओझे आपण संपवू तरच
संपेल.२४६

पूजा देवासाठी नसून भक्ताच्या पारमार्थिक प्रगतीसाठी करायची असते, याची कल्पना नसल्याने वर्षानुवर्षे पूजा करूनही अनेक भक्त 'तसेच' राहातात.२४७

खाल्लेले एकट्याला जगवते, पण
पेरलेले अनेकांना जगवते, हे
जाणून जगले तर त्याग व सार्थक
वेगळे शिकायला नको.२४८

गुरूंना शिष्यातली गुरुमूर्ती दिसूनही त्या बाजूचा अनावश्यक भाग काढून टाकण्याच्या गुरूंच्या प्रयत्नांना सर्वच शिष्यांचे सहकार्य मिळत नाही. म्हणून काही वेळा गुरूंना अनेक गुरू घडवता येत नाहीत.२४९

सत्संगाचा उतार मिळाला, तर
साधकांच्या इंजिने बंद पडलेल्या
गाड्यासुद्धा वेगाने धावू लागतात,
पण त्या, तो उतार असेपर्यंतच !२५०

स्वार्थाची कामे माणसाला
स्वबळावर करावी लागतात,
नि:स्वार्थाची भगवंताच्या
बळावर होतात.२५१

प्रपंचातले सुख मिरवणे म्हणजे
प्रत्यक्ष बारा वाजलेले असताना
आपल्या घड्याळातले काटे एकवर
नेऊन, हा पहा एक वाजला
म्हणण्यासारखे आहे.[२५२]

बरेच लोक संघर्षांतला आनंद घेतात, काही आनंदासाठी संघर्ष करतात व थोडे लोक संघर्षमुक्त होऊन खरा आनंद घेतात !२५३

अन्न शिजवून दिले, भूक दिली,
घास भरवला तरी न गिळणारे
शिष्य भेटले, तर गुरूच्या पदरी
अपयशाशिवाय काय पडणार? २५४

आपण सर्वच भगवंताचे आहोत, फरक एवढाच की, संतांचे ते कधी विसरत नाही आणि आमच्या ते कधी लक्षात राहात नाही !२५५

स्वार्थाच्या प्रेरणेला सावध
राहावे लागत नाही,
नि:स्वार्थी व्हायला मात्र
सावध राहावे लागते ! २५६

काही गुरू तांबडा दिवा
दाखवतात, शिष्य न थांबला तर
हिरवा दिवा दाखवतात. नफा-
नुकसान शिष्याचेच आहे.२५७

उपलब्ध असलेला सारा वेळ
शोधून तो नामाला दिला
जाईल, तेव्हा ते वृत्तीपर्यंत
पोचायला सुरुवात होईल.२५८

गुरूंच्या सांगण्यातले आपल्याला
आवडणारे व सोयीचे पडणारे
आचरणे, याला अनेक शिष्य
आज्ञापालन समजतात !२५९

‘भगवंत आपला’ यामधून पुढे
जायचे विसरल्याने ‘आपण
भगवंताचे’ या भक्तीतल्या
प्रगतीच्या पुढच्या पायरीवर
अनेकांना जाता येत नाही.२६०

देखावे, क्षणिक सुखे व संकुचितता यांना सरावलेल्या प्रापंचिकांनी खऱ्या, शाश्वत आनंदमय, विशालतेच्या परमार्थाला बहुमताने नावे ठेवावी, हे परमार्थाचे प्रारब्ध आहे.२६१

दीपासारखे स्तंभावर न जाताही
संत आपल्यात राहून जवळच्यांना
व दूरच्यांनाही आनंदमार्गाचा
प्रकाश पोचवू शकतात.२६२

निर्जीव संगणकसुद्धा कार्यरत राहायला मध्ये बंद करावा लागतो, तर उत्तम कार्यशीलतेसाठी तरी मन मधूनमधून शांत करणाऱ्या उपासनारूप विश्रांतीची सजीव माणसाला गरज आहे ना ? २६३

देवाला अभक्तांपेक्षा
जास्त गंभीर प्रश्न
विपरीत भक्तांचा आहे ! २६४

जगाची मदत 'नावा' पुरती
व अपुरी; देवाची मात्र 'त्याचे
नाव' हीच व पुरी !२६५

अधिकारी माणसाकडून शिकावे.
सामान्य प्रापंचिकाकडून शिकणे,
म्हणजे एका भ्रमलेल्याकडून
दुसऱ्या भ्रमलेल्याने शहाणपण
शिकण्यासारखे आहे.२६६

सख्खे माणूस नसले तरी चालेल,
पण असलेल्या माणसांशी सख्य
ठेवून राहायला शिकले, तरी
माणसाला सोबत राहाते.२६७

खऱ्या देवद्वारी अभक्तांना
नमस्कार, विषयभक्तांना
बंदद्वार व भक्तांना मुक्तद्वार
असते.२६८

साधनेची अखेर
भगवंतापुढे आपल्याला
एकटे पाडण्यात होते.२६९

काहींचे ‘स्वतःचे घर’ असते,
काहींच्या घरात ‘देव्हारा’ असतो,
काहींच्या ‘घरात देवघर’ असते
आणि काहींचे ‘घर देवघर’
असते.२७०

डॉ. सुहास पेठे यांची ही बोधवचने म्हणजे शुद्ध परमार्थमार्गावरील अभ्यासू व्यक्तींना चिंतनाची एक पर्वणीच होय. कारण या वचनांमागे डॉ. पेठे यांचे तीन तपांचे मूलगामी चिंतन, स्वानुभव, अभ्यास, प्रयोग अशी विस्तृत पार्श्वभूमी आहे. शुद्ध परमार्थाचे आकलन व आचरण यांसाठी त्यांची ही वचने आमच्याप्रमाणे इतरांनाही उपयोगी ठरतील म्हणून संकलित व प्रकाशित होत आहेत.

* संतछाया, सातारा *